International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March -2022, Impact Factor: 7.429, Available online at: www.ijaresm.com

73 व्या घटनादुरुस्तीचे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महत्त्व

घायतडके सचिन सहादू

संशोधक विद्यार्थी (राज्यशास्त्र विभाग) पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर

----------**********----------

प्रस्तावना

भारतात 1992 पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा नव्हता त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्मितीमध्ये व कामकाजामध्ये सुसूत्रता नव्हती. स्थानिक स्वराज्य संस्थांचा कार्यकाळ हा निश्चित नव्हता. त्यामुळे एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर निर्माण झाली होती.

पंचायत राज संस्थांचे ग्रामीण विकासातील महत्त्व ओळखून स्थानिक स्वराज्य संस्थांना महत्त्वाचे स्थान देण्याचा निर्णय त्यावेळचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी घेतला.पंचायत राज संस्थांविषयी अनेक राज्य उदासीन होती. त्यामुळे सर्वच राज्यांमध्ये पंचायत राज व्यवस्थेची एकचरचना आवश्यक होती.

24 एप्रिल 1993 या दिवसापासून 73 वी घटना दुरूस्ती अमलात आली. 73 व्या घटनादुरुस्तीने पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला. स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या क्षेत्रात सामाजिक न्याय आणि आर्थिक विकासाचे निर्णय घेण्याची स्वायत्तता व अधिकार या घटनादुरुस्तीने दिले. आरक्षणाच्या तरतुदीने वंचित व दुर्बल घटकांना प्रतिनिधित्व करण्याची संधी या घटनादुरुस्तीने मिळाली. ग्रामीण विकासाच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण अशी घटनादुरुस्ती आहे.

गृहीतके-

1) 73 व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायतराज संस्थांमधील स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढला आहे.
2) समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व करण्याची संधी 73 व्या घटनादुरुस्तीने मिळाली आहे.
3) पंचायत राज संस्थांच्या कार्यामध्ये नियमितता आणि सुसूत्रता 73व्या घटना दुरुस्तीमुळे आली आहे.

भारतातील पंचायत राज व्यवस्थेचा इतिहास-

भारतात अगदी प्राचीन काळापासून स्थानिक स्वशासन अस्तित्वात असलेले दिसते . भारतात प्राचीन काळात असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम व स्वयंपूर्ण होत्या . मध्य प्राचीन कालखंडात पंचायतराज शासनाचे काही पुरावे दिसतात . उत्तर प्राचीन कालखंडातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात अनेक साहित्य व शिलालेख उपलब्ध आहेत . भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थापन होईपर्यंत ग्रामपंचायत हा घटक ग्रामीण प्रशासनाचा केंद्रबिंदू होता.

प्राचीन काळात लोकांनी आप ले व्यवहार सांभाळण्यासाठी स्थानिक प्रशासनाची निर्मिती केली होती . प्राचीन काळात अनेक राज्यकर्ते होऊन गेले मात्र ग्रामपंचायतींची स्वायत्तता टिकून होती. या काळात पंचायत राज व्यवस्थेची उत्कृष्ट रचना होती त्यामुळे या काळाला पंचायतीचे 'सुवर्णयुग' म्हटले आहे. कौटिल्य आणि मॅगेस्थनिसच्या लिखाणात पंचायत राज व्यवस्थे चा उल्लेख असलेला दिसतो. प्राचीन काळात गावातील ज्येष्ठ व्यक्तींची मिळून पंचायत तयार होत असे. या व्यक्तींना पंच असे म्हटले जाई. पंचायतीच्या प्रमुखास ग्रामी णी किंवा ग्रामिक असे म्हट ले जाई. अनेक सार्वजनिक स्वरूपाची कामे प्राचीन पंचायतीमार्फत केली जात असत. उदाहरणार्थ गावांच्या सीमांचे रक्षण करणे, मंदिरे धार्मिक स्थळे इत्यादी ठिकाणी स्वच्छता व नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण, महसूल गोळा करणे इत्यादी कामे केली जात असत.

प्राचीन काळात स्वयंपूर्ण आणि सक्षम असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना ब्रिटिशांच्या काळात उतरती कळा लागली . ब्रिटिशांनी जुन्या ग्रामपंचायतीचे विघटन करून नव्याने त्यांना प्रशासन चालविण्यासाठी सोपे जाईल अशा पद्धतीने स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यावर भर दिला . ब्रिटिशांनी स्थानिक स्वराज्य संस्थांपेक्षा नोकरशाहीवर जास्त भर दिला . पाटील, कुलकर्णी यांना पगार देण्यास सुरुवात केली .ब्रिटिशांनी अशा प्रकारे केंद्री करण करण्याचा प्रयत्न केला असला तरी स्थानिक प्रशासन महत्त्वा चे असल्याचे त्यांच्या लक्षात आले व त्यातून अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांनी काही कायद्यांच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना पुनर्जीवन देण्याचा प्रयत्न केला . यामध्ये 1960 चे रॉयल कमिशन ओन डिसेंट्रलायजेशन, लार्ड रिपनचा ठराव 1882, लार्ड मियोचा ठराव 1870 या कायद्यांचा समावेश होतो . ब्रिटिशांनी भारतात महानगरपालिका आणि जिल्हा लोकल बोर्ड अशा स्थानिक प्रशासनाला सुरुवात केली . भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतात सुरुवातीला सामुदायिक विकास कार्यक्रमांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजना आणि ग्रामीण विकासाच्या योजना राबवल्या गेल्या.सामूहिक विकास कार्यक्रम आणि राष्ट्रीय विस्तार सेवा यांना आलेले अपयश लक्षात घेऊन या योजनांचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने बलवंतराय मेहता समितीची स्थापना केली.

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार भारतात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेचा पाया घातला गेला . ऑक्टोबर 1959 रोजी राजस्थान मध्ये पंचायत राज व्यवस्थेचे प्रथम उद्घाटन करण्यात आले . त्यानंतर केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारने पंचायत राज व्यवस्थेचे अवलोकन करण्यासाठी विविध समित्यांची निर्मिती केली .1986साली स्थापन करण्यात आलेल्या डॉ. लक्ष्मीम ल सिंघवी समितीच्या शिफारशीनुसार 73 वी घटना दुरुस्ती विधेयक तयार करण्यात आले यामुळे पंचायत राज व लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणाऱ्या पर्वास प्रारंभ झाला.

७३ व्या घटना दुरुस्ती ची पार्श्वभूमी-

भारतात पंचायत राज व्यवस्थेला संविधानिक दर्जा प्राप्त करून देण्यासाठी 1992 मध्ये 73 वी व 74 वी घटना दुरुस्ती करण्यात आली.1986 मध्ये पंचायतराज चे पुनर्गठन करण्याच्या उद्देशा ने राजीव गांधी सरकारच्या काळात डॉ . लक्ष्मीम ल सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली . या समितीच्या शिफारशींमध्ये पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा असावा अशी शिफारस करण्यात आली होती.

15 मे 1989 मध्ये पंतप्रधान राजीव गांधी यांनी 64 वे पंचायत राज घटना दुरुस्ती विधेयक संसदेत मांडले . लोकसभेत हे विधेयक पारित झाले मात्र राज्यसभेत पुरेशा पाठिंब्याचा अभा वामुळे हे विधेयक फेटाळले गेले . त्यामुळे हा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला. त्यानंतर 1989 च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसला बहुमत न मिळाल्याने जनता दलाचे व्ही पी सिंग यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले या सरकारच्या काळातही या विधेयकाचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. त्यानंतर 1991 साली सत्तेत आलेल्या पी व्ही नरसिंहराव यांनी सर्वप्रथम या घटनादुरुस्ती साठी सर्वपक्षीय सदस्य समिती गठीत

केली व या समितीच्या शिफारशीनुसार पंचायत राज घटनादुरुस्ती विधेयक 22 डिसेंबर 1992 ला संसदेत सादर केले . लोकसभा व राज्यसभा यांनी 23 डिसेंबर 1992 ला या विधेयकाला मान्यता दिली व त्यानंतर 20 एप्रिल 1993 ला या विधेयकावर राष्ट्रपतींची सही होऊन या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले.

73 **वी घटनादुरुस्ती-**

स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी आणि स्वायत्तता प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने 73 वी घटनादुरुस्ती करण्यात आली. या घटनादुरुस्तीने भारतीय संविधानात 9 भागात नव्याने कलम 243(A)ते कलम 243(O)ही कलमे समाविष्ट करण्यात आली. तसेच भारतीय संविधानात 11 वे परिशिष्ट जोडण्यात आले व त्यात पंचायत राज संस्थांच्या संदर्भातील 29 विषयांची सूची देण्यात आली.

७३ व्या घटना दुरुस्ती मधील काही महत्त्वाची कलमे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

कलम 243 **ए**- पंचायत राज व्यवस्थेचे आधारभूत घटक हा ग्रामसभा असेल असे या कलमात म्हटले आहे.
कलम 243 **बी** या कलमानुसार भारतात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय रचना असेल असे स्पष्ट करणे केले आहे . मात्र वीस लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या राज्यात पंचायत समितीची स्थापना न करता दोनच स्तरांमध्ये पंचायत राज व्यवस्था असावी अशी तरतूद करण्यात आली आहे.
243 **सी** या मध्ये पंचायत राज ची संरचना स्पष्ट करण्यात आली आहे.
कलम 243 **डी** अन्वये पंचायत राजच्या तिन्ही स्तरांवर आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे . यामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण आहे . इतर मागासवर्गीयांसाठी देखील लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित असतात. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे.
कलम 243 **(E)अन्वये** पंचायत राज संस्थांचे कार्यकाल पाच वर्ष निश्चित करण्यात आला आहे.
कलम 243 **(I)** नुसार वित्त आयोगाची तरतूद करण्यात आली आहे . राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आर्थिक विषयांवर सुसूत्रता आणण्याचे काम वित्त आयोग करते.
243 **(J)** नुसार पंचायत राज संस्थांना नियमित लेखांकन करणे व लेखापरीक्षण करावे लागते.
243 **(**k)नुसार प्रत्येक राज्यासाठी राज्य निवडणूक आयोग असेल अशी तरतूद करण्यात आली आहे . स्वराज्य संस्थांच्या नियमित निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाकडे असते.

73 व्या घटना दुरुस्ती चे महत्त्व-

73 व्या घटना दुरुस्तीमुळे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला . तसेच सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वायत्तता प्राप्त प्राप्त झा ली. त्याचप्रमाणे ग्रामसभेला महत्त्वाचे स्थान देण्याचे काम 73 व्या घटनादुरुस्तीने केले आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महि ला आणि समाजातील दुर्बल व वंचित घटकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. 73 घटनादुरुस्तीमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग आणि महिला या घटकांना आरक्षण मिळाल्यामुळे या घटकांचे मोठ्या प्रमाणात सक्षमीकरण झाले व स्थानिक पातळीवर प्रतिनिधित्व करण्याची संधी या घटकांना मिळा ली. स्त्रियांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग विचारात घेतला तर 73 वी घटनादुरुस्ती होण्याच्या अगोदर ही महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये होत्या अगदी महाराष्ट्रातील 1990च्या

कायद्याच्या अगोदर देखील महिला स्थानिक स्वराज्य संस्थांवर होत्या मात्र त्यांचे प्रमाण अत्यल्प होते . प्रत्येक ग्रामपंचायतीवर किमान दोन महिला नियुक्त केलेल्या असत आणि त्याही फक्त सदस्यपदी होत्या. त्यातही वरिष्ठ वर्गातील स्त्रिया च स्थानिक स्वराज्य संस्थांवरती प्रतिनिधित्व करत होत्या.

1997 च्या उपलब्ध आकडेवारीनुसार 29 जिल्हा परिषद मधून निवडून आलेल्या 1762 सदस्यांपैकी 587 महिला तर 319 पंचायत समित्यांवर 3524 सदस्यांपैकी 1174 स्त्रिया होत्या तर 43 हजार गावांमधील 80 ते 85 हजार सदस्यांपैकी 7 हजार 54 महिला सदस्य होत्या.तसेच दहा जिल्हा परिषदांवर महिला अध्यक्ष होत्या तर 106 पंचायतसमित्यांवर सभापती म्हणून महिला काम पाहत होत्या. तसेच नऊ हजारांहून अधिक सरपंच महिला होत्या.

सध्या महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग हा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. 2020-21 च्या महाराष्ट्रातील ग्रामपंचायत निवडणुकीची आकडेवारी लक्षात घेता पुणे जिल्ह्यातील वेल्हा तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींपैकी 37 ग्रामपंचायतींवर महिला सरपंच पहायला मिळतात. तसेच वाशीम जिल्ह्यात सुद्धा 490 ग्रामपंचायतींपैकी 246 ग्रामपंचायतींचे सरपंचपद हे महिलांसाठी राखीव करण्यात आलेले आहे. पालघर जिल्ह्याचा विचार केला तर 473 ग्रामपंचायतींपैकी जुलै 2021 पर्यंत 306 ग्रामपंचायतींवर प्रशासक होते तर उरलेले 167 ग्रामपंचायतींपैकी 70 ग्रामपंचायतीमध्ये महिला सरपंच होत्या. म्हणजेच 73 व्या घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व करण्याचा आकडा हा मोठ्या प्रमाणात वाढलेला आपल्याला पाहायला मिळतो.

अनुसूचित जाती आणि जमाती तशेच इतर मागासवर्ग यांचा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधित्व करण्याचा टक्का देखील मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कर्जत तालुक्यातील 52 ग्रामापंचायातींमधील 17 सरपंच पदे ही अनुसूचित जमाती साठी तर 15 इतर मागासप्रवर्ग व अनुसूचित जाती साठी 2 सरपंचपदे राखीव आहेत. तशेच पंढरपूर तालुक्यातील अनुसूचित जमाती साठी 3 तर अनुसूचित जाती साठी 10 सरपंच पदे राखीव आहेत. म्हणजेच १९९२ च्या अगोदर ज्या वंचित घटकांचा राजकीय प्रक्रियेत समावेश नव्हता त्यांना 73 व्या घटना दुरुस्तीमुळे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे.

निष्कर्ष

1) 73 व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायत राज संस्थांच्या निवडणुकीत नियमितता आली आहे दर पाच वर्षांनी पंचायत राज संस्थांच्या नियमित निवडणुका होतात त्यामुळे वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी संपुष्टात आली आहे.
2) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेचनेतृत्व करण्याचा महिलांचा टक्कासुद्धा वाटला आहे.
3) 73 व्या घटना दुरुस्तीमुळे वंचित व दुर्बल घटकांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व मिळत आहे.

संदर्भ

1) Pranab Bardhan and DilipMookharjee (2007) Decentralization and local governor in Developing countries: Oxford University Press, New Delhi.
2) खारगे विकास (2010) पंचायत राज व्यवस्था नवी भूमिका: यशदा पुणे .
3) डॉ. शिरसाठ शाम आणि डॉ. बैनाडे भगवानसिंग (जून,2010) भारतीय स्थानिक स्वशासन: विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
4) पंचायत राज व्यवस्थेतील स्त्रियांचा सहभाग (10 मार्च,२०२१) साप्ताहिक साधना.
5) डॉ. पाटील दिलीप (फेब्रुवारी,२०२१) ग्रामीण विकासाची ओळख: दूर व मुक्त अध्ययन केंद्र मुंबई विद्यापीठ.

6) योजना (नोव्हेंबर,२०२१) पंचायत राज
7) www.esakal.com
8) www.vikaspedia.com